दिनांक / /२०१५

मा. कार्यकारी अधिकारी
श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती,
पंढरपूर जिल्हा सोलापूर – ४१३३०४

विषय – श्री. विठ्ठलाची नित्यपूजेची सेवा करण्याची परवानगी मिळणे बाबत
अर्जदाराचे पूर्ण नांव – श्री ––––––––––––––––––––––––––––––––––––––––
संपूर्ण पत्ता ––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––
––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––
पिन कोड ––––––––––––––––––––––––––––––––––––––––––
संपर्क क्रमांक – ––––––––––––––––––––
इमेल आयडी – ––––––––––––––––––––

महोदय,

वि ायात नमूद केले प्रमाणे विनंती अर्ज करतो की, मला माझे कुटूंबातील व्यक्तीसह श्री. विठ्ठलाची नित्यपुजा करावयाची आहे. त्यासाठी दिनांक / /२०१५ रोजीची नित्यपूजा करणेची संधी मला मिळणेस विनंती आहे. त्यासाठीची देणगीची रक्कम रू. २५०००/– मी डिमांड ड्राफ्टने/ रोखीने भरलेली आहे. सदरच्या नित्यपूजे बाबतच्या मंदिर समितीच्या सर्व अटी, शर्ती व सूचना ( वेबसाईट वरील आणि अर्जासोबत दिलेल्या ) मला मान्य आहेत. त्याचे मी व माझे सोबतच्या व्यक्ती तंतोतंत पालन करू.

१) नित्यपूजेच्या वेळी माझे कुटूंबातील ज्या ५ व्यक्तींना (पती व पत्नी, त्यांचे आई वडील आणि मुले या पैकी ५ व्यक्ती ) पूजेसाठी श्री विठ्ठलाच्या गाभाऱ्यात प्रवेश द्यावयाचा आहे त्यांची नावे –

| अ.क्र. | पूर्ण नांव | वय | विवाहीत/ अविवाहीत | अर्जदार भाविकाशी नाते |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |
| ५ | | | | |

(या सर्वाच्या फोटो ओळखपत्रांच्या झेरॉक्स प्रती मी सोबत जोडल्या आहेत.)

२) या नित्यपूजेच्या वेळी माझे खाली नमुद केलेले ५ नातेवाईक मंदिरातील चांदीच्या कमानी जवळ बसून पूजा पाहण्यासाठी उपस्थित राहतील.( त्यांना गाभाऱ्यात प्रवेश असणार नाही.)

| अ.क्र. | पूर्ण नांव | वय | विवाहीत/ अविवाहीत | अर्जदार भाविकाशी नाते |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |
| ५ | | | | |

(या सर्वाच्या फोटो ओळखपत्रांच्या झेरॉक्स प्रती मी सोबत जोडल्या आहेत.)

३) देणगी डिमांड ड्राफ्टने दिली असल्यास बॅकेचे नांव, डि.डि. क्रमांक व दिनांक ( सोबत डि.डि जोडला आहे.)

––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––

४) देणगी रोख भरली असल्यास पावती क्रमांक व दिनांक ( सोबत पावतीची झेरॉक्स प्रत जोडली आहे.)

––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––

५) सदरच्या नित्यपूजे बाबतच्या अर्जा पाठी मागे छापलेल्या सर्व अटी, शर्ती व सूचना ( वेबसाईट वरील आणि अर्जासोबत दिलेल्या ) मला व माझे वर नमूद केलेल्या नातेवाईकांना मान्य आहेत. त्यांचे आम्ही तंतोतंत पालन करू..

तरी मला व माझे वर नमूद केलेल्या नातेवाईकांना दिनांक / /२०१५ ( वार – ) या तारखेला श्री विठ्ठलाची नित्यपुजा करण्याची परवानगी मिळावी ही विनंती.

आपला विश्वासू,

––––––––––––––––––––

टिप – नित्यपुजेच्या अटी, शर्ती व नियम मान्य असले बाबत अर्जदाराने पाठी मागील बाजूस सुध्दा सही करावी.

## नित्यपुजे बाबतच्या अटी, शर्ती व नियम –

**१)** नित्यपूजेच्या वेळी समितीच्या उपस्थित पुजाऱ्यां मार्फत ज्या सूचना देण्यात येतील, त्या सूचनांचे तंतोतंत पालन करणे आवश्यक राहील.

**२)** नित्यपूजेसाठी इच्छुक भाविक व त्यासोबतच्या ९ व्यक्तींना पूजेच्या दिवशी पहाटे ३.४५ वाजता व्ही.आय.पी. गेट मधून प्रवेश देण्यात येईल. प्रवेशाचे वेळी नित्यपूजा मंजुरीचे मुळ पत्र व सर्वांची मुळ ओळखपत्र तपासून प्रवेश देण्यात येईल. पूजेला मंदिरात येताना पादत्राणे, मोबाईल, कॅमेरा, पर्स इत्यादी वस्तु सोबत आणता येणार नाहीत.

**३)** नित्यपूजेच्या वेळी इच्छूक भाविकांच्या कुटूंबातील ५ व्यक्तींना ( पती व पत्नी, त्यांचे आई वडील आणि मुले या पैकी ५ व्यक्ती ) पूजेसाठी श्री. विठ्ठलाच्या गाभाऱ्यात प्रवेश दिला जाईल. अशा व्यक्तींची नांवे अर्जात नमूद करणे आवश्यक राहील. तसेच त्यांच्या फोटो ओळखपत्राच्या झेरॉक्स प्रती अर्जा सोबत जोडणे आवश्यक राहील. तसेच पूजेच्या वेळी मुळ ओळखपत्र सोबत आणणे आवश्यक आहे.

**४)** श्री.विठ्ठलाचे पदस्पर्श दर्शन रांगेतील एका भाविक पती–पत्नीस नित्यपूजेसाठी सहभागी करून घेणे आवश्यक राहील. सदरच्या भाविक पती–पत्नीची निवड मंदिर समितीच्या नित्योपचार विभागाकडून करण्यात येईल..

**५)** इच्छूक भाविकांच्या कुटूंबातील पूजेसाठी गाभाऱ्यात प्रवेश करणाऱ्या पुरूशांनी सोवळे व उपरणे आणि महिलांनी व लहान मुलांनी स्वच्छ धुतलेली वस्त्र नेसणे आवश्यक राहील.

**६)** सदर नित्य पूजेच्या वेळी पुजारी श्री. विठ्ठलाला केशर पाणी घालत असताना आपणास हलक्या हाताने श्रीच्या मुर्तीस स्पर्श करून स्नान घालता येईल. त्यावेळी मुर्तीची झीज होणार नाही या दृष्टीने हातामध्ये अंगठी सारखी कोणतीही वस्तु घालता येणार नाही.

**७)** श्री.विठ्ठलाचे स्नान झालेनंतर पूजाऱ्या मार्फत पोषाख, नैवेद्य व आरती करण्यात येईल .त्यावेळी आपणांस गाभाऱ्या बाहेर बसविण्यात येईल..त्यानंतर.आपल्या ५ व्यक्तींना श्री. विठ्ठलास तुळशी व फुले अर्पण करून पदस्पर्श दर्शन करून मंदिर समितीकडून देण्यात येणारा पेढयाचा नैवेद्य दाखविता येईल.. त्यानंतर आपल्या उर्वरीत ५ नातेवाईकांना श्री. विठ्ठलाचे पदस्पर्श दर्शनाचा लाभ घेता येईल.

**८)** नित्यपूजेच्या वेळी इच्छुक भाविकाच्या कुटूंबातील वर नमुद ५ व्यक्ती शिवाय, नात्यातील अन्य ५ व्यक्तींना मंदिरातील चांदीच्या कमानी जवळ बसून पुजा पाहता येईल. त्यांना गाभाऱ्यात प्रवेश दिला जाणार नाही. अशा ५ व्यक्तींची नांवे अर्जात नमूद करणे आवश्यक राहील. तसेच त्यांच्या फोटो ओळखपत्राच्या झेरॉक्स प्रती अर्जा सोबत जोडणे आवश्यक राहील. तसेच पूजेच्या वेळी मुळ ओळखपत्र सोबत आणणे आवश्यक आहे.

**९)** पूजेसाठी येत असले बाबतचा खात्रीशीर निरोप पूजेच्या आदल्या दिवशी सांयकाळी ६ वाजे पर्यत नित्योपचार विभागास देणे आवश्यक आहे.

**१०)** एकदा पूजेचे बुकींग केले नंतर कोणत्याही कारणास्तव रद्द करता येणार नाही व देणगीची
रक्कम परत मागता येणार नाही.

**११)** अति महत्वाच्या कारणांसाठी आपली पुजा रद्द करण्याचा अधिकार या कार्यालयास राहील. त्याबाबत कोणतीही तक्रार करता येणार नाही..त्यावेळी पुजेची पुढील उपलब्ध तारीख आपणांस देण्यात येईल. .किंवा भाविकाची इच्छा असल्यास देणगीची रक्कम परत करण्यात येईल.

**१२)** अपूर्ण माहिती भरलेले आणि अर्जात नमूद केलेली कागदपत्र न जोडलेले अर्ज नामंजूर करण्यात येतील.

**१३)** आपला अर्ज इकडे प्राप्त होण्यास पोस्टा मार्फत विलंब झालेस. हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

अटी शार्ती व नियम मान्य असले बाबतची अर्जदाराची सही ———————————————————